# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

---

जा.क्र.मऔविम/मुनि/P-३९१५००/२०२५ दिनांक :- १७/०१/२०२५

## परिपत्रक

विषय :- महामंडळाचे भूखंडांबाबत अधिकारांमध्ये सुधारणा करण्यात आलेल्या परिपत्रकाच्या अनुषंगाने नियोजन विभागातील कामकाजाचे पुनर्रचनेबाबत..

संदर्भ :- परिपत्रक क्र.मऔविम/भूविभाग/मव्य(भूमि/पी१६०७१३, दि.०१.०१.२०२५.

उपरोक्त संदर्भांकीत परिपत्रका अन्वये भूखंड/शेड/गाळा वाटप, हस्तांतरण, एकत्रिकरण, विभाजन व सबलीज मंजूर करण्यासाठी वेगवेगळ्या भूखंड वाटप समितीना अधिकार प्रदान केलेले आहेत.

नियोजन विभागातील कामाचा आवाका विचारात घेता प्राप्त झालेल्या प्रकरणांचा जलद निपटारा करणेसाठी संदर्भिय परिपत्रकाच्या अनुषंगाने भूखंड/शेड/गाळा वाटप, हस्तांतरण, एकत्रिकरण, विभाजन व सबलीज मंजूर करण्यासाठी नियोजन विभागातील अधिका-यांचे कार्यक्षेत्र पुढीलप्रमाणे राहील.

| अ. क्र. | कामकाज विषय | कार्यक्षेत्र | | सक्षम अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | | ४. |
| १. | औद्योगिक भूखंडाचे एकत्रिकरण, विभाजन, सबलीज. | | | |
| | अ) ८००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंत | प्रादेशिक कार्यालयात कार्यरत नियोजन विभागातील अधिकारी.<br>सहायक रचनाकार/सहायक वास्तुशास्त्रज्ञ /उप रचनाकार/ उप वास्तुशास्त्रज्ञ | | क्षेत्रिय स्तरावरील नियोजन विभागातील अधिका-यांनी नियोजन विषयक अभिप्राय देऊन प्रस्ताव संबंधीत प्रादेशिक अधिकारी यांचेकडे सादर करावा. |
| | आ) ८००१ चौ.मी. ते २०,००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंत | कोकण विभाग | श्रीमती स्वाती वाघ, सहयोगी वास्तुशास्त्रज्ञ. | सहयोगी वास्तुशास्त्रज्ञ / सहयोगी रचनाकार यांनी नियोजन विषयक अभिप्राय देऊन प्रस्ताव संबंधीत उप मुख्य कार्यकारी यांचेकडे प्रस्ताव सादर करावा. |
| | | पुणे विभाग | श्री.आशुतोष पाचपुते, सहयोगी रचनाकार. | |
| | | नाशिक व छत्रपती संभाजीनगर विभाग | श्री.विद्युल माने, सहयोगी रचनाकार | |
| | | नागपूर व अमरावती विभाग | श्री. आबाजी घुटे, सहयोगी रचनाकार | |

(For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | इ) २०,००१ चौ.मी. ते त्यावरील | <u>मुख्य नियोजक</u> | | प्रादेशिक कार्यालयाकडून प्राप्त प्रस्ताव मुख्य नियोजक यांनी संबंधीत सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर करावा. |
| २ | **व्यापारी भूखंड/व्यापारी गाळयांचे तसेच निवासी भूखंडाचे हस्तांतरण, एकत्रिकरण, विभाजन, सबलीज.** | | | |
| | अ) १००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंत | प्रादेशिक कार्यालयात कार्यरत नियोजन विभागातील अधिकारी. सहायक रचनाकार/सहायक वास्तुशास्त्रज्ञ /उप रचनाकार/ उप वास्तुशास्त्रज्ञ. | | क्षेत्रिय स्तरावरील नियोजन विभागातील अधिका-यांनी नियोजन विषयक अभिप्राय देऊन प्रस्ताव संबंधीत प्रादेशिक अधिकारी यांचेकडे सादर करावा. |
| | आ) १००१ चौ.मी. ते १०,००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंत | कोकण विभाग | श्रीमती स्वाती वाघ, सहयोगी वास्तुशास्त्रज्ञ. | सहयोगी वास्तुशास्त्रज्ञ / सहयोगी रचनाकार यांनी नियोजन विषयक अभिप्राय देऊन प्रस्ताव संबंधीत उप मुख्य कार्यकारी यांचेकडे प्रस्ताव सादर करावा. |
| | | पुणे विभाग | श्री.आशुतोष पाचपुते, सहयोगी रचनाकार. | |
| | | नाशिक व छत्रपती संभाजीनगर विभाग | श्री.विद्युल माने, सहयोगी रचनाकार | |
| | | नागपूर व अमरावती विभाग | श्री. आबाजी घुटे, सहयोगी रचनाकार | |
| | इ) १०,००१ चौ.मी. ते त्यापेक्षा जास्त. | <u>मुख्य नियोजक</u> | | प्रादेशिक कार्यालयाकडून प्राप्त प्रस्ताव मुख्य नियोजक यांनी संबंधीत सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर करावा. |
| ३. | **माहिती तंत्रज्ञान व जैव तंत्रज्ञान उद्यानातील/औद्योगिक क्षेत्रातील भूखंडाचे हस्तांतरण, एकत्रिकरण, विभाजन, सबलीज.** | | | |
| | अ) १००० चौ.मी. पर्यंत | नियोजन विभागातील संबंधीत नियोजन अधिकारी त्यांचे अभिप्राय प्रादेशिक अधिकारी (मा.व.तं.) यांचेकडे सादर करावे. | | |
| | आ) १००० चौ.मी. व त्यापेक्षा अधिक | प्रादेशिक अधिकारी (मा.व.तं.) यांचेकडून प्राप्त प्रस्ताव मुख्य नियोजक यांनी संबंधीत सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर करावा. | | |

१. ना.ज.क.धा. हस्तांतरण शुल्क आकारण्याबाबतचे अधिकार सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले असून यापुढे ना.ज.क.धा. हस्तांतरण शुल्क (ULC Charges) परिगणित करून आकारणीबाबतची सर्व प्रकरणे भूविभागाने नियोजन विभागाकडे न पाठविता परस्पर सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे मान्यतेसाठी सादर करावीत.

२. वृक्ष छाटणीकरीता परवानगी देण्याचे अधिकारी संबंधीत वृक्ष अधिकारी तथा विनिप्रा यांना प्रदान करण्यात येत आहेत.

midcconsultants.in

(For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in)

३. सहयोगी रचनाकार यांनी संबंधीत उप मुख्य कार्यकारी अधिकारी आणि प्रादेशिक अधिकारी यांचेशी समन्वय साधून प्रत्येक आठवडयातून मंगळवार आणि बुधवार या दिवशी क्षेत्रिय स्तरावर हजर राहून कामाचा निपटारा करावा.

४. सहयोगी रचनाकार यांनी प्रादेशिक कार्यालय स्तरावरील नियोजन विभागातील अधिकारी यांचे अभिप्राय घेऊन अंतिम झालेल्या एकूण प्रस्तावांपैकी किमान १० टक्के प्रस्तावांची पुनर्तपासणी करावी. त्याचप्रमाणे वरिष्ठ नगर रचनाकार यांनी सहयोगी रचनाकार यांच्या स्तरावर अंतिम झालेल्या एकूण प्रस्तावांपैकी किमान ५ टक्के प्रस्तावांची पुनर्तपासणी करावी. सदर अंतिम निर्णय प्रक्रियेत कोणतीही अनियमतता आढळून आल्यास संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करावी.

उपरोक्त सुधारीत धोरण, कामकाजाची विभागणी व अधिकारातील बदल इत्यादींची नोंद घ्यावी व तात्काळ प्रभावाने कार्यवाही करण्यात यावी.

(पी. वेलरासू, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
मऔविम, मुंबई.

प्रत :-

१) सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुख्यालय, मुंबई.
२) मुख्य अभियंता (पुणे/छत्रपती संभाजीनगर/नागपूर).
३) महाव्यवस्थापक (भूमि/विधी/भूसंपादन/मावतं/जनसंपर्क/मबवि/डीएमआयसी/पणन).
४) सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
५) सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
६) सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
७) सह/उप मुख्य लेखाधिकारी, मऔविम, मुंबईव/पुणे/छत्रपती संभाजीनगर/नागपूर).
८) सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग क्रेंद.
९) सर्व औद्योगिक संघटना.
१०) मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय, मरोळ, मुंबई/जागतिक व्यापार क्रेंद, मुंबई.
११) मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती.

midcconsultants.in

**(For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in)**